जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ८४० दिनांक - ०१/१२/२०२३**

भारती विदयापीठ पोलीस स्टेशन,पुणे शहर

## मकोका मध्ये एक वर्षापासुन फरार असलेला कात्रजच्या सदस्याला केले जेरबंद

**भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन,पुणे गुन्हा रजि नं.३७६/२०२२,भा.द.वि.कलम ३०७,३२४, ३२३,५०४,५०६,१४३,१४७,१४९,आर्म ॲक्ट ४(२५),महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१)(३)सह १३५,क्रिमीनल अमेंडमेंन्ट ॲक्ट कलम ७,महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा कलम ३(१)(ii),३(२),३(४)** या गुन्हयातील पाहीजे आरोपीत **तौफिक लाला शेख,वय-२६ वर्षे,रा. १०/३, मांगडेवाडी,भैरवनाथ हाईटस,कात्रज, पुणे** हा मागील एक वर्षापासुन मिळुन येत नव्हता. सदर आरोपीत हा त्याचे अस्तीत्व लपवुन वारंवार वेग-वेगळया जिल्हयांमध्ये त्याची ओळख व ठाव-ठिकाणा बदलुन वास्तव करीत होता.

सदर आरोपीत तौफिक शेख याचा भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनकडील तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार तांत्रिक विश्लेषणावरुन शोध घेत असताना,पोलीस अंमलदार,विक्रम सावंत, अभिजीत जाधव यांना नमुद आरोपी हा मांगडेवाडी,गणपती मंदीराजवळ त्याचे आईस भेटण्यासाठी आला आहे अशी खात्रीलायक बातमी मिळाल्याने लागलीच तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी सदर ठिकाणी जावुन आरोपीताचा शोध घेतला तौफिक लाला शेख हा मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन पुढील कारवाईकामी गुन्हयाचे तपासी अधिकारी मा.सहाय्यक पोलीस आयुक्त,स्वारगेट विभाग,पुणे,श्री.नारायण शिरगावकर यांचे ताब्यात देण्यात आले असुन,त्यांनी सदर आरोपीत यास नमुद गुन्हया मध्ये अटक केली आहे.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुकत,पश्चिम प्रादेशीक विभाग,पुणे,श्री.प्रविणकुमार पाटील, मा. पोलीस उप-आयुक्त परिमंडळ-०२,श्रीमती.स्मार्तना पाटील मा.सहाय्यक पोलीस आयुक्त,स्वारगेट विभाग, पुणे, श्री.नारायण शिरगावकर यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस स्टेशनकडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.विनायक गायकवाड, तसेच पोलीस निरीक्षक,(गुन्हे),श्री.विजय पुराणिक, श्री.गिरीश दिघावकर, सहा.पोलीस निरीक्षक,अमोल रसाळ, पोलीस उपनिरीक्षक,धिरज गुप्ता, पोलीस अंमलदार,अभिजीत जाधव, विक्रम सावंत, शैलेश साठे, सचिन सरपाले, चेतन गोरे, महेश बारावकर, मंगेश पवार, निलेश ढमढेरे, हर्षल शिंदे, अवधतु जमदाडे, निलेश खैरमोडे, धनाजी धोत्रे, सचिन गाडे, राहुल तांबे, मितेश चोरमोले, आशिष गायकवाड, अभिनय चौधरी यांचे पथकाने केली आहे.